**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रोजगार मेळाव्यात ५१ हजार युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप

- कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दरात शेतमाल न विकण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन, सर्व मालाच्या खरेदीची ग्वाही

- बेकायदा बांग्लादेशींची काळी यादी तयारी करुन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही याची खबरदारी घेण्याचे राज्य सरकारचे निर्देश

- इस्लामपूरचं नाव बदलून ईश्वरपूर करण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाला केंद्राची मान्यता

**आणि**

- जाहिरात क्षेत्रातले दिग्गज पियुष पांडे यांचं मुंबईत निधन

**<><><><><>**

देशाच्या युवावर्गाची स्वप्ने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीतल्या सतराव्या रोजगार मेळाव्याला व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून संबोधित करत होते. या रोजगार मेळाव्यात वेगवेगळ्या सरकारी खात्यांमध्ये पदं मिळालेल्या ५१ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रं देण्यात आली. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत ११ लाख नियुक्त्या केल्या असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड प्रधानमंत्री बाइट (२४ सेकंद)**

या मेळ्याचा भाग म्हणून मुंबईत झालेल्या कार्यक्रमात मंत्री आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा आणि महाराष्ट्र गोवा सर्कलचे पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह यांच्या हस्ते ८० उमेदवारांना नियुक्तीपत्रं दिली गेली. आज नियुक्तीपत्र

मिळालेल्या सगळ्यांनी स्वतःला तंत्रज्ञान, नवोन्मेष, संशोधन, तसंच व्यवस्था परिवर्तनाच्या अनुषंगानं अद्ययावत ठेवावं, असं आवाहन शेलार यांनी यावेळी केलं.

नागपूर इथं आयोजित कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते २५ उमेदवारांना प्रातिनिधिक स्वरूपात, तर एकूण ११३ जणांना नियुक्तीपत्रं दिली गेली.

**<><><><><>**

कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दरात शेतमाल विकू नये, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. मुंबईत वार्ताहरांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध यंत्रणांच्या माध्यमातून खरेदी केंद्राचं जाळं निर्माण केलं आहे. या केंद्रांवर शेतकऱ्यांचा संपूर्ण माल खरेदी केला जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><><>**

भावी पिढ्या आरोग्यदायी असाव्यात यासाठी नैसर्गिक शेती करणं गरजेचं असल्याचं राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत राजभवनात मंत्रिमंडळ आणि विधानमंडळाच्या सदस्यांसाठी नैसर्गिक शेती या विषयावर आयोजित चर्चासत्राला मार्गदर्शन करताना बोलत होते. रासायनिक शेतीमुळे आरोग्यासह जमिनींचंही मोठं नुकसान होतं, तर नैसर्गिक शेतीमुळं उत्पादन वाढीसोबतच पर्यावरण रक्षण होतं, नैसर्गिक शेतीत समस्त प्राणिमात्रांचं कल्याण अंतर्भूत आहे, असं ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही या चर्चासत्रात मार्गदर्शन केलं. महाराष्ट्राला नैसर्गिक शेतीचं केंद्र बनवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. वातावरणातल्या तीव्र बदलांवर नैसर्गिक शेती हा शाश्वत उपाय आहे, असं ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नैसर्गिक शेती ही समाजाची आणि देशाची गरज असल्याचं मत व्यक्त केलं.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, विधान मंडळाचे सदस्य आणि अधिकारी या चर्चासत्राला उपस्थित होते.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जीवन प्रवासावर आधारित Modi’s Mission या पुस्तकाचं या पुस्तकाचं प्रकाशन आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते मुंबईत राजभवनात झालं. प्रख्यात वकील बर्जिस देसाई यांनी हे पुस्तक लिहिलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><>

बेकायदेशीर  बांग्लादेशी नागरिकांची काळी यादी तयारी करुन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे निर्देश राज्य सरकारनं दिले आहेत. दहशतवाद विरोधी पथकानं गुन्हा दाखल केलेल्या पावणे तेराशे बेकायदेशीर बांग्लादेशी नागरिकांकडे कुठलीही कागदपत्रं असतील तर ती रद्द करण्याचे आदेशही सरकारनं दिले. शिधापत्रिकांचं वितरण करताना कागदपत्रांची किंवा निवासाची काटेकोर पडताळणी करावी, असंही या आदेशात म्हटलंय.

<><><><>

राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणानं महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातल्या जैवविविधता संवर्धनासाठी १ कोटी ३६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामध्ये राज्यात सातारा जिल्ह्यातल्या साखरवाडी आणि पुणे जिल्ह्यातल्या कुंजीरवाडी या गावांची निवड झाली असून तिथल्या  जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना प्रत्येकी पंचेचाळीस लाख पन्नास हजार रुपयांचा निधी मिळणार आहे.

<><><><>

सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर गावाचं नाव ईश्वरपूर करायला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली आहे. यासंदर्भात राज्य सरकारनं केंद्राला प्रस्ताव पाठवला होता. आता ईश्वरपूर  नगरपरिषद, ईश्वरपूर  विधानसभा मतदारसंघ

यांसह तालुका, जिल्हा अशा सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांवर हेच नाव वापरलं जाईल.

<><><><>

आधुनिक भारतीय जाहिरात क्षेत्राचे शिल्पकार पियुष पांडे यांचं मुंबईत निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. गेले काही दिवस ते विषाणू संसर्गाने आजारी होते.

ऑगिल्व्ही या जाहिरात कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष असलेले पांडे यांना २०१६ साली पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होत.

भाजपाच्या ‘अबकी बार मोदी सरकार’ या जाहिरातीचे, तसंच पोलिओ लस अभियानाच्या ‘दो बूंद जिंदगी के’ या जाहिरातींचे ते जनक होते. कॅडबरी डेरी मिल्क, एशियन पेंट्स, वोडाफोन इत्यादी अनेक सुप्रसिद्ध कंपन्यांच्या जाहिरातींच्या कल्पना त्यांनीच यशस्वी केल्या होत्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

बहारीनमध्ये सुरू असलेल्या आशियायी युवा स्पर्धांमध्ये १८ वर्षांखालच्या मुली आणि मुलांच्या भारतीय कबड्डी संघानं सुवर्ण पदक पटकावलं आहे. मुलींच्या संघानं इराणला ७५-२१ असं १२ वर्षातल्या सर्वात मोठ्या फरकानं नमवलं. मुलांच्या संघानं इराणला ३५-३२ असं हरवलं.
या स्पर्धेत मुलींच्या १०० मीटर अडथळ्यांच्या धावण्याच्या स्पर्धेत ठाण्याची शौर्या अंबुरे हिला रजत पदक मिळालं.

<><><><>

सलग ६ सत्रात असलेल्या तेजीला देशातल्या शेअर बाजारांनी आज विराम दिला. काल वर्षभरातल्या उच्चांकी पातळीला स्पर्श केलेल्या देशातल्या दोन्ही

शेअर बाजारात आज घसरणीचं वातावरण होतं. सकाळपासून सुरू झालेली घसरण दुपारनंतर आणखी वाढली आणि सेन्सेक्स ३४५ अंकांची घट नोंदवून ८४ हजार २१२ अंकांवर बंद झाला. निफ्टीही ९६ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार ७९५ अंकांवर बंद झाला.

अमेरिका आणि चीनमध्ये व्यापार कराराच्या वाटाघाटी, रशियावर लादलेले निर्बंध आणि वाढत असलेल्या कच्च्या तेलाच्या किंमती यामुळं बाजारात घसरण झाल्याचं विश्लेषकांनी सांगितलं.

**<><><><><>**

हवामान बदलाची परिस्थिती लक्षात घेता गेल्या काही वर्षांप्रमाणे देशात थंडीची लाट येण्याची शक्यता गृहीत धरुन त्यासाठी पूर्वतयारी करावी असी सूचना राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं १९ राज्य सरकारे आणि ४ केंद्रशासित प्रदेशांना दिली आहे. २०१९ ते २०२३ या कालावधीत थंडीच्या लाटेमुळे ३ हजार ६३९ मृत्यूंची नोंद झाल्याची माहिती आहे. विशेषतः दुर्बल समाजघटकांना थंडीच्या तडाख्यापासून संरक्षण देण्याच्या हेतूने मानवाधिकार आयोगाने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन आयोगाला मार्गदर्शकपर सूचना केल्या आहेत.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशमध्ये कुर्नुल इथे आज पहाटे खाजगी प्रवासी बसला लागलेल्या आगीत किमान २० जणांचा मृत्यू झाल्याच कुर्नुलच्या पोलीस अधीक्षकांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

साताऱ्यातल्या महिला डॉक्टरच्या आत्महत्येप्रकरणी राज्य सरकारनं एका पोलिसाला निलंबित केलं आहे. या डॉक्टरचा मृतदेह फलटणमधल्या एका हॉटेलमध्ये आढळून आला. पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने आणि हवालदार प्रशांत बनकर यांनी त्रास दिल्याचा संदेश त्यांनी आत्महत्येपूर्वी लिहून ठेवला होता.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात निकृष्ट बांधकामांचा जाब विचारल्याबद्दल ग्रामपंचायताच्या महिला सदस्य आणि तिच्या पतीला मारहाण करण्यात आली. लाखांदूर तालुक्यातल्या खोलमारा गावातल्या आरओ प्लांटचं बांधकाम निकृष्ट झाल्याचा त्यांचा आरोप होता.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात आज दुपारी सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. धुळे शहरात आणि तालुक्यातल्या अनेक गावात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकणात अनेक ठिकाणी मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात, कोकणात बहुतांश ठिकाणी मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची, तसंच किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**